क्रमांक प्रशि/पो.भ./पोलीस पाल्य/४९०/२०१५. /1790

मुंबई, दिनांक १७/०२/२०१६.
17 FEB 2016

संदर्भ :- १) शासन निर्णय, गृहविभाग, क्रमांक लवेसु-३६१३/प्र.क्र.२३८/पोल-५अ, दिनांक २२.८.२०१४ व

२) ह्या कार्यालयाचे समक्रमांकित, दिनांक १६.२.२०१६ चे परिपत्रकीय ज्ञापन.

विषय :- पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पोलीस शिपाई भरतीमध्ये ५ टक्के आरक्षण ठेवणेबाबत.

******

संदर्भाधिन, दिनांक २२.८.२०१४ च्या शासन निर्णयान्वये पोलीस पाल्यांना खालीलप्रमाणे आरक्षण ठेवले आहे. त्यास अनुसरुन प्राप्त झालेले शासन पत्र, गृहविभाग, क्रमांक पोलीस-१८१५/प्र.क्र.३०६/पोल-५अ, दिनांक १६.२.२०१६ ची प्रत ह्या कार्यालयाच्या संदर्भाधिन, दिनांक १६.२.२०१६ च्या परिपत्रकीय ज्ञापनासोबत घटक प्रमुखांना वर्तुळीत केली आहे. तथापि, वर नमूद शासन पत्रातील मुद्दा क्रमांक १ वरील स्पष्टीकरणामध्ये शासनाने सुधारणा केलेले दिनांक १६.२.२०१६ चे सुधारीत शासन पत्र प्राप्त झाले असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.

२. घटक प्रमुखांनी ह्या कार्यालयाच्या दिनांक १६.२.२०१६ च्या परिपत्रकीय ज्ञापनासोबतच्या दिनांक १६.२.२०१६ च्या शासन पत्रानुसार कार्यवाही न करता, ह्या ज्ञापनासोबत जोडलेल्या दिनांक १६.२.२०१६ च्या सुधारीत शासन पत्रानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी.

( डॉ.रविंद्र कुमार सिंगल )
**विशेष पोलीस महानिरीक्षक,**
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके,
महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्गसह)
सर्व पोलीस अधीक्षक, (लोहमार्गसह)
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्रमांक १ ते १६.

प्रत सादर:

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत सविनय सादर:

अपर मुख्य सचिव, गृहविभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२.

प्रत सस्नेह,

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अपर पोलीस महासंचालक, का.व सु./आस्थापना/प्रशासन/नि.व स./राज्य राखीव पोलीस बल/लोहमार्ग, म.राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, नागपूर / पुणे
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, कॅंप नागपूर.

Scanned by CamScanner

क्रमांक : पोलीस १८१५/प्र.क्र.३०६/पोल- ५ अ

महाराष्ट्र शासन
गृह विभाग, मंत्रालय,
जागतिक व्यापार केंद्र, सेंटर-१
कफ परेड, मुंबई ४०० ००५
दिनांक : १६ फेब्रुवारी, २०१६.

17 FEB 2016
24981/16

अपर पोलीस महासंचालक,
प्रशिक्षण व खास पथके
महाराष्ट्र राज्य, मुंबई

विषय : पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना पोलीस शिपाई भरतीमध्ये
५ टक्के आरक्षण ठेवणेबाबत..

संदर्भ : आपले पत्र क्र.प्रशि/पोशि-भरती/ मार्गदर्शन-पोलीस पाल्य/२०१५/२०५४,
दिनांक २८ एप्रिल, २०१५ चे पत्र

उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने कळविण्यात येते की,

मुद्या क्र.१ बाबत स्पष्टीकरण :- अंशकालीन पदवीधरांसाठी राखीव असलेल्या समांतर आरक्षणापैकी, ३ टक्के आरक्षण हे पोलीस दलातील नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी राखीव ठेवण्यात आले आहे. सदर सवलत ही गट क व गट ड संवर्गातून सेवानिवृत्त झालेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना लागू राहील.

मुद्या क्र.२ बाबत स्पष्टीकरण :- शासकीय सेवेत असताना दिवंगत/अकाली सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकास अनुकंपा तत्तावर नियुक्तीबाबतच्या प्रचलित नियमानुसार अनुकंपा नियुक्ती शासकीय कर्मचाऱ्यांच्या फक्त एकाच नातेवाईकास देते. यास्तव मुद्या क्र.२ येथे नमूद केल्यानुसार सेवेत असताना मृत्यु पावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांचा एक मुलगा/मुलगी अथवा त्यांची पत्नी यांची अनुकंपा तत्वावर पोलीस विभागात नियुक्ती झाली असल्यास, त्यांच्या (मृत्यु पावलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या) दुसऱ्या मुलास/मुलीस पोलीसाचा मुलगा ही सवलत लागू राहणार नाही.

मुद्या क्र.३ बाबत स्पष्टीकरण :- सक्तीने सेवानिवृत्त/स्वेच्छा सेवानिवृत्ती घेतलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या पाल्यास ही सवलत लागू राहणार नाही.

( शैला मिठबावकर )
कक्ष अधिकारी, गृह विभाग

Scanned by CamScanner